## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०५/२०१८

**१) अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १०/०४/२०१८ चे ११.३० ते १२.०० ते दिनांक १४/०४/२०१८ चे ०७.३० ते ०८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे घरी कोणीही वढीलधारी व्यक्ती हजर नसतांनी आरोपीनी कुणीही नसल्याची संधी साधुन घरामध्ये प्रवेश करुन फिर्यादीची पिडीत मुलगी हिला आमीष दाखवुन तिच्यांवर अत्याचार करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७६(१),५०६ भादवी. सहकलम ४,८,१२ बा.लै.अ.प्र. कायदा २०१२ सहकलम ३(२)(५)(१)अ.जा.अ.प्र.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. टिक्कस पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) क्षुल्लक कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०५/२०१८ चे २२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी ही फिर्यादीची सुन लागत असुन फिर्यादीचे व आरोपीचे आपसात पटत नसल्याने आरोपीने फिर्यादीची पत्नी हिला तु माझ्या नवऱ्यासाठी पोळी बनवुन देण्याची काय गरज होती तो तुझा नवरा आहे का? असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व बाबुच्या दांडयात असलेली लोखंडी बरसीने धावण्यास धावली फिर्यादी हा मधात आडवा आल्याने त्याचे डाव्या हाताच्या बोटाला मारुन जखमी करुन फिर्यादीचे पत्नीला जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,२९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/०५/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस दारु पिण्याकरीता पैसे मागीतले असता फिर्यादीने पैसे दिण्यास नकार दिल्याने आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीचे दोन्ही हात पकडुन आरोपी क्र. १ याने जवळ पडलेल्या दगडाने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी करुन पडून गेल्याने जखमी फिर्यादी सौ. अनिता गुलाब शेंडे वय ४५ वर्ष, रा. देव्हाडा नरसिंग टोला हिचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन भांडण करुन थापड बुक्यांनी मारहान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १३/०५/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अनंत प्रकाशराव कुबळे वय ३३ वर्ष, रा. प्लॉट नं. १०३ गल्ली नं. ६ शिव मंदीर जवळ भवानी नगर पारडी नागपुर जि. नागपुर एस. टी. आगार इमामवाडा नागपुर चालक हे त्याचे कर्तव्य बजावत असतांनी एस टी क्र. एमएच ४०/ एन ८८१७ नी प्रवासी घेवुन गोंदिया वरुन भंडारा कडे मोठा पुलीया पास करुन दर्गा जवळ असतांनी यातील मोटार सायकल चालक हा ग्रामीण पोस्टेच्या रस्त्याकडून येवुन एसटी बसच्या समोरुन अचानक रोड क्रास केल्याने एस.टी. चालकाने ब्रक मारले असता एस.टी.बस ही ईलेक्ट्रीक डिपीला आदळता– आदळता वाचली. तरी सुध्दा आरोपी मोटार सायकल चालक यांनी एस.टी. बस चाल यांचेशी अरेरावी करुन तोंडातोंडी भांडण करुन तु बस कशी चालवतो असे बोलुन थापड मारुन शिवीगाळ केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**५) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/०५/२०१८ चे ०५.३० ते ९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही मजुरी कामा करीता गेली असता तिची मुलगी ही कुणालाही काही न सांगता घरुन निघुन गेली फिर्यादीने तिचे नातेवाईकात शोध घेतला असता मिळुन न आल्याबाबतची तक्रार दिल्याने व शासन परिपत्रकाप्रमाणे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**६) टिप्पर डाल्या खाली दबुन मार लागुन जखमी झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०५/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन पलटी केल्याने सोबत असलेला किरण बडवाईक रा. आमगाव हा टिप्परचे डाल्याचे खाली दबल्याने त्यास मार लागुन जखमी झाल्याने फिर्यादी मारोती यशंवत मासुलकर वय ४२ वर्ष रा. सुरेवाडा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक १३/०५/२०१८ चे ०८.१५ वाजता दरम्यान यातील मृतक तुळशिराम झिटोबा राघोर्ते वय ८५ रा. सुरेवाडा टोली यांनी दिनांक ०८/०५/२०१८ रोजी सकाळी ०५.०० वा. पुर्वी कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता डॉ. निर्वाण हॉस्पीटल भंडारा येथे भरती केले व तेथुन दिनांक ११/०५/२०१८ ला सामान्य रुग्नालय भंडारा येथे उपचाराकरीता भरती केले असतां आज रोजी उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी मधुकर तुळशिराम राघोर्ते वय ४५ वर्ष, रा. सुरेवाडा टोली यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नान्हे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक ११/०५/२०१८ चे १४.४० वाजता दरम्यान यातील मृतक राजकुमार हरीदास परतेकी वय ३२ वर्ष, रा. पात्री याने जास्त प्रमाणात मद्य प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे प्रथम उपचार करुन पुढील उपचारा करीता दिनांक ११/०५/२०१८ चे ००.५५ वाजता दरम्यान आयसीयु वार्ड भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**९) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

**अ**) दिनांक १३/०५/२०१८ चे २०.१० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत टोल नाका कारधा वाहन चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे बिथ्रअल्कोहोल ॲनालायझर मशिन व्द्रारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मेश्राम वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मो. वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सफौ. नान्हे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**ब**) दिनांक १३/०५/२०१८ चे २०.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत टोल नाका कारधा वाहन चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे बिथ्रअल्कोहोल ॲनालायझर मशिन व्द्रारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. शेख वानीशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मो.वा. का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सफौ. नान्हे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**<u>१०) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—</u>**

दिनांक १३/०५/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा सुमो निलज येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या —जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका व वाहतुकीसं अडथळा निर्माण करुनबंद स्थितीत मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोळवते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोळवते पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

**<u>११) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—</u>**

दिनांक १३/०५/२०१८ चे १८.१५ ते १९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महीन्द्रा पिकअप वाहन ही बाजार चौक देव्हाडी येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या —जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका व वाहतुकीस अडथळा निर्माण निर्माण करताना मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. मल्होत्रा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मल्होत्रा पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**<u>१२) अवैध हातभट्टी / देशी दारु अडड्यांवर धाडी . :—</u>**

दिनांक १३/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी / देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८० लिटर हातभंट्टी दारू किमती ८०००/—रु. १ लिटर १७० मिली लिटर देशी दारु किंमती ३९०/—रु. तसेच असा एकुण किंमती ८,३९०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**<u>१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—</u>**

दिनांक १३/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १८८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक— ०९ तीन सिटर वाहनाकरीता— १२ ईतर वाहनांवरती — १६७ केसेस करण्यात आले आहे.

14/5/18

**(डी.डब्लयु मंडलवार)**

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**

**दुरध्वनी क्र.८८८८९६०५६०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता